**खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शाळांमध्ये इ.१ली ते इ.१०वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०११/ प्र.क्र.९७/शिक्षण -१

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३० डिसेंबर, २०११.

वाचा : १ शासन निर्णय,शिक्षण क्रिडा व समाजकल्याण विभाग, क्रमांक इबीसी-१०६८/ ८३४६७/जे,दिनांक २४/१२/१९७०

२ शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक :एफईडी-१०९६/प्र.क्र.१९७८ /९६ / साशि-५,दिनांक १३/६/१९९६

३ शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक एफईडी/२०००/(१२१/२०००)/ माशि-८, दिनांक १५/११/२०००

४ शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक:एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७/५/२००३

५ शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक:पीआरई-२००३/(३५२६)/प्राशि-१, दिनांक २८/५/२००३

**प्रस्तावना :**

शिक्षण क्रिडा व समाजकल्याण विभाग यांच्या दिनांक २४/१२/१९७० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गातील इ.१ली ते इ.१० वीमध्ये शिकत असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असतील अशा विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती प्रमाणित दराने केली जाते. शालेय शिक्षण विभागाचे दिनांक १३/६/१९९६ चे शासन निर्णयान्वये प्रमाणित दराने शुल्क आकारणा-या शासन मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व सत्र शुल्क शासनाकडून अदा केले जाते. मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण शुल्क निश्चिती संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने टि.एम.ए.पै.

फाऊंडेशन विरुध्द कर्नाटक शासन (याचिका क्र.३१७/१९९३) प्रकरणी दिनांक ३१/१०/२००२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाने दिनांक २७/५/२००३ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यानुसार मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक व इतर शुल्क संबंधित शाळा / महाविद्यालयाचे व्यवस्थापन निश्चित करील अशी तरतूद आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना किती प्रमाणात प्रतिपूर्ती करावी याबाबत सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभाग जे धोरण ठरवेल ते धोरण लागू राहिल, अशी उक्त शासन निर्णयात तरतूद आहे. अद्यापी, याबाबत सामाजिक न्याय विभागाने धोरण ठरविलेले नव्हते. तथापि प्रमाणित दराने फी आकरणा-या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या फीची प्रतीपूर्ती शासन निर्णय दिनांक १३/६/१९९६ अन्वये निश्चित केलेल्या दराने करण्यात येत होती.

२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संपूर्ण फीची प्रतीपूर्ती शासनाने करावी यासाठी नरेंद्र गोसावी व इतर शैक्षणिक संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहितार्थ याचिका क्र.७९/२०१० व रिट याचिका क्र.१७२४/२०१० दाखल केली होती. या दोन्ही प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/४/२०११ अन्वये निर्णय देवून, **"मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या (अनुसूचित जाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती, व विशेष मागास प्रवर्ग) शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची प्रतिपुर्ती शासनाने फेब्रुवारी, २०१० मध्ये नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालातील विकल्प-१ प्रमाणे थकबाकीसह देण्याचे आदेश दिलेले आहेत."** त्या अनुषंगाने खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत इ.१ ली ते १० वी पर्यंत शाळेतील मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या फी ची प्रतिपूर्तीच्या दरास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने याबाबत साकल्याने सर्वकष विचार केला असून पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शाळांमध्ये इ.१ ली ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील **दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील** विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची प्रतीपूर्ती सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून दरवर्षी १० महिन्याच्या कालावधीकरिता पुढील दराने करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे:-

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी साठी अनुदाने (विघयो) (२२२५ ३८४१), ३१- सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

३. दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील वि.जा.भ.ज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा प्रतिपूर्तीचा खर्च पुढील लेखाशिर्षाखालील मंजुर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

१) मागणी क्रमांक एन ३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०३- मागासवर्गीयांचे कल्याण, २७७ शिक्षण,

(०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(०२) माध्यमिक शाळेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या (२२२५ ०७८२) ३४ शिष्यवृत्त्या/विद्यावेतन, (योजनेत्तर योजना)

२) मागणी क्रमांक एन ३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०३- मागासवर्गीयांचे कल्याण, २७७ शिक्षण,

(०३) जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान (०३) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ याच्या कलम १८२ अन्वये सहाय्यक अनुदान (२२२५ ०८८९) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (योजनेत्तर योजना)

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक 201112300729321232001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दिनेश वाघमारे )
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सा.न्या.यांचे खाजगी सचिव

www.A-PDF.com to remove the watermark

अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय प्रतिपुर्ती दर

| अ.क्र. | इयत्ता | विद्यार्थ्यांना द्यावयाची दरमहा (शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्काची) प्रतिपुर्ती (वर्षातुन दहा महिने कालावधीसाठी) |
|---|---|---|
| १ | १ली ते ४थी | रु.१०० /- दरमहा |
| २ | ५वी ते ७वी | रु.१५०/- दरमहा |
| ३ | ८वी ते १०वी | रु.२००/- दरमहा |

२. दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांचा शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपुर्ती खालील लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा:-

१) मागणी क्रमांक एन ३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०४) (११) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिक्षणासाठी शिक्षण व परिक्षा फी ची प्रदाने (विघयो) (२२२५ ०४४१)

३४- शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने.

२) मागणी क्रमांक एन ३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, (०८)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण व परिक्षा फी साठी अनुदान (विघयो) (२२२५ ०५४८), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

३) मागणी क्रमांक एन ३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, (०८) जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान

पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, (०८) (०३) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना, माध्यमिक शाळेत शिकणा-या